# प्रधान सचिवांची ‘आयआयएम’ नागपूरला भेट



**नागपूर :** राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकास रस्तोगी यांनी रविवारी भारतीय व्यवस्थापन संस्था नागपूरला भेट दिली.

यावेळी ‘आयआयएम’ नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मेत्री यांनी रस्तोगी यांना विविध उपक्रमांची माहिती दिली. ‘आयआयएम’ नागपूर येथे विकसित केलेल्या सुविधांचे कौतुक करताना रस्तोगी म्हणाले, ‘आयआयएम’ नागपूरने नवोदित व्यवस्थापन व्यावसायीकांना आवश्यक असणारे विविध अभ्यासक्रम सुरू केले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना याचा फायदा होणार आहे.